# रंकाळा लवकरच घेणार मोकळा श्वास

## नवा प्रस्ताव मागविला : महापौर, आयुक्तांकडून पाहणी; कामे रेंगाळलेलीच

### वाचकांना आवाहन

रंकाळ्यात वारंवार उद्‌भवणाऱ्या जलपर्णीमुळे रंकाळ्याचे सौंदर्य लोप पावत आहे. जलपर्णीवर कायमस्वरूपी काय उपाययोजना करता येईल, यासंबंधीच्या प्रतिक्रिया आम्हाला अडीचशे शब्दांपर्यंत कळवा. त्यातील निवडक प्रतिक्रियांना प्रसिद्धी देण्यात येईल.

कार्यकारी संपादक,

प्रतिक्रिया पाठविण्याचा पत्ता : १४६६, सी वॉर्ड,
हेडा चेंबर्स, कोंडाओळ, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

सकाळ

बातमीचा परिणाम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : रंकाळ्यात मिसळणारे सांडपाणी रोखण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न न करता आणखी एका कन्सल्टन्सीकडून प्रस्ताव मागविला आहे. आज 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'अनास्थेने रंकाळ्याचे पुन्हा विद्रुपीकरण' वृत्तानंतर दुपारी आयुक्त विजय सिंघल, महापौर उदय साळोखे यांनी पाहणी केली. जनसुराज्य शक्ती पक्षाचे नेते मंत्री विनय कोरेही उपस्थित होते. मंजूर कामांच्या पूर्ततेऐवजी 'ग्रासरूट रिसर्च अँड कन्सल्टन्सी'कडून नवा प्रस्ताव मागविण्याचाच निर्णय झाला.

रंकाळा तलावात सांडपाणी मिसळत असल्याने जलपर्णीची वाढ होत होती. तलावात बारा ठिकाणांहून नागरी वस्त्यांमधील सांडपाणी मिसळते. त्याकडे उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष होत आहे. परताळ्याच्या बाजूने सांडपाणी अद्याप मिसळते आहे. मध्यंतरी जलपर्णी काढण्यासाठी विविध स्थानिक संस्थांनी सहकार्य केले; मात्र आता 'पेस्तीया' पाणवनस्पतीची अतोनात वाढ सुरू आहे.

आज यासंदर्भात 'सकाळ'मध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यावर दुपारी साडेबाराच्या सुमारास आयुक्त, महापौरांसह पक्षप्रतोद अजित राऊत, प्रा. जयंत पाटील, प्रभारी जलअभियंता राजेंद्र ताडे यांनी पाहणी केली. राजघाट परिसरात उपस्थित राहून तलावातील जलपर्णी काढण्याबाबत आणि स्वच्छतेबाबत चर्चा झाली. दरम्यान, अपारंपरिक ऊर्जामंत्री विनय कोरेही तेथे आले. या वेळी ग्रासरूट रिसर्च अँड कन्सल्टन्सीच्या पल्लवी लाटकर उपस्थित होत्या. त्यांनी ग्रासरूट कन्सल्टन्सीतर्फे यापूर्वी केलेल्या तलाव व्यवस्थापनाबाबत माहिती दिली. त्यानंतर त्यांना १० जानेवारीपूर्वी प्रस्ताव देण्यास सांगण्यात आले.

दरम्यान, रंकाळा तलावाच्या संवर्धनासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेतून साडेआठ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. त्यातील कामांना सुरवातही झाला आहे. योजनेनुसार तलावात जाणारे सांडपाणी रोखणे, हे सांडपाणी अन्यत्र

पान २ वर ▶



कोल्हापूर : रंकाळा तलावाला सध्या जलपर्णीने विळखा घातला आहे. या संदर्भात शुक्रवारी (ता. १२) 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीनंतर आयुक्त विजय सिंघल, महापौर उदय खराडे, पक्षप्रतोद अजित राऊत, प्रभारी जलअभियंता राजेंद्र ताडे आदींनी पाहणी केली.